**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>(प्रशासकिय विषय )</u>**

**<u>विषय क्रमांक ०४</u>:-** प्रभाग क्रमांक २१ जुनीवस्ती बडनेरा येथील सांस्कृतीक भवनाच्या जागेवरील शौचालयाचे बांधकाम पाडणे व सावता मैदानाच्या दक्षिण बाजुची कंपाऊंड वॉल पाडणे.

**<u>ठराव क्रमांक ०४</u>:-** प्रभाग क्रमांक २१ जुनीवस्ती बडनेरा येथील प्लॉट नं.१२, शिट नं.१ सी या सांस्कृतीक भवनाच्या जागेवरील शौचालयाचे बांधकाम पाडणे व सावता मैदानाच्या दक्षिण बाजुची कंपाऊंड वॉल पाडणे आवश्यक आहे. यास मा.आयुक्तांनी दि.१८.१२.२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे. ही सभा सर्वानूमते असे ठरविते की, पर्यायी व्यवस्थेबाबत सबंधीत प्रभागाचे स्वास्थ निरिक्षकांकडुन १०० टक्के ओडीएफबाबतचा अहवाल घ्यावा. कन्हैय्या कुंज सातुर्णा येथील सार्व.शौचालयाचा वापर करणाऱ्यांना १००% वैयक्तिक शौचालय देण्यात आले असल्याने तेथील सार्व.शौचालय पाडण्यात यावे. विषयास सर्वानूमते मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**(स्थायी समितीकडुन आलेले कामकाज)**

**<u>विषय क्रमांक ०५</u>** :- रस्त्यावरील अनाथ, अपंग, बेघर, बेसहारा लोकांना इ. हक्काचा निवारा देणेकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत वुमेन्स फाऊंडेशन अमरावती यांचे प्रस्तावास मान्यता प्रदान करणेबाबत.

**<u>ठराव क्रमांक ०५</u>** :- उपरोक्त संदर्भीय विषयानुसार वुमेन्स फाऊंडेशन अमरावती यांचे प्राप्त प्रस्ताव दिनांक ८.१२.२०१७ नुसार मनपाचे तालाब पुरा नागपुरी गेट येथील इमारतीमधील जागा मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

प्राप्त प्रस्तावानुसार मनपाला इमारत व्यतिरिक्त कोणताही खर्च करावयाचा नसुन सर्व व्यवस्था व खर्च संबंधीत संस्था उचलण्यास तयार आहे या निवाऱ्यामध्ये बाधित तसेच बेघर उघडयावर झोपणारे लोक वास्तव्य करणार आहे समाज उपयोगी काम असल्याने नाममात्र भाडयाने संलग्न अटी शर्तीचे अधिन राहुन इमारत देण्यास स्थायी समिती सभा दि.१२.०१.२०१८ चे सभेतील ठराव क्र. १९२ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात येऊन विषय मान्यतेकरिता सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला. ही सभा सर्वानुमते स्थायी समितीने पारीत केलेल्या उपरोक्त विषयास मंजूरी प्रदान करीत असुन उपरोक्त संस्थेसह प्रायोगीक तत्वावर ११ महिन्यांकरिता करार करण्यास मान्यता प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.**

**(स्थायी समितीकडुन आलेले कामकाज)**

**विषय क्रमांक ०६** :- महानगरपालिका क्षेत्रात उत्पन्नवाढीचे अनुषंगाने लावण्यात येणारे जाहिरातींकरीता जाहीरात परवानगी शुल्क निश्चित करण्यास व त्या अनुषंगाने कंत्राटाचे शर्ती व अटी तयार करण्याचे सुधारीत धोरणास मान्यता प्रदान करण्याबाबत.

**ठराव क्रमांक ०६** :- अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या जाहीराती लावण्यात येतात. महापालिकेस जाहीरातीपासुन मिळणारे भाडे उत्पन्न अल्प प्रमाणात असुन त्यामध्ये वर्गीकरण नसल्याने यासर्व बाबींचा समावेश करुन धोरण ठरविणे प्रशासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने सदर जाहीरातदारांकडुन वसुल करण्याकरीता जाहीरात परवानगी शुल्क व भाडेबाबतची दरसुचि परिशिष्ट "अ" व त्या अंतर्गत येणारे मार्गाची यादी परिशिष्ट "ब" व "क" तयार करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

सबब जाहीरात परवानगी शुल्क निश्चित करण्यास उत्पन्नवाढीकरीता सदर सुधारीत धोरण राबविणे आवश्यक असल्याने सदर धोरणास व या विषयाचे अनुषंगाने जाहीरात कंत्राटाबाबत अटी व शर्ती तयार करण्यास ही सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करीत असुन ठरावासोबत जाहीरात परवानगी शुल्क व भाडेबाबतची दरसुचि परिशिष्ट "अ" व त्या अंतर्गत येणारे मार्गाची यादी परिशिष्ट "ब" व "क" नुसार तयार करण्यात आलेल्या यादीस सर्वसाधारण सभेत धोरण ठरविण्याचे मान्यतेकरीता स्थायी समिती सभा दि.१२.०१.२०१८ चे ठराव क्रमांक १९३ अन्वये विषय सादर करण्यात आला. ही सभा सर्वानुमते स्थायी समितीने पारीत केलेल्या उपरोक्त प्रशासकीय प्रस्तावास व संलग्न असलेल्या परिशिष्टांमधील दरास मंजुरी प्रदान करीत असुन प्रशासनाने सामाजीक हिताच्या जाहीरातींचे दर वाजवी ठेवण्याबाबत सूचनेचा विचार करावा त्याचसह अटी व शर्ती या सुलभ ठेवण्यात याव्यात असे ही सभा सर्वानूमते ठरविते.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**(प्रशासकिय विषय)**

**<u>विषय क्रमांक ०६</u> :-** मौजा तारखेडा शेत सर्व्हे क्र. २४ मधील २०७,२११,२१२ हे अध्यक्ष भुतपुर्व सैनिक बहुउद्देशिय सामाजिक व शैक्षणिक संस्था, अमरावती यांचे सभासद श्री. महादेव स.शिरसाठ व इतर पाच यांना बाजार भावाने खरेदी करुन देणेबाबत.

**ठराव क्रमांक ०६ :-** मौजा तारखेडा येथील भु.क्र. २०६ ते २१२ विषयांकीत आवेदक संस्था यांनी मागणी केलेले आहेत, प्रशासना तर्फे अमनपा/ससंनर/३६५, दि. ०८.११.२००५ अन्वये रु. १००० प्रती चौ.मी. दराने देणे बाबत कळविण्यात आले हाते. आवेदक संस्था यांनी उक्त दरामध्ये भुखंड घेण्यास संमती दिली नाही त्यामुळे आवेदक संस्थेस भुखंड खरेदी करुन देण्यात आले नाहीत. दरम्यानच्या काळात आवेदक संस्था यांनी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसुचित जमाती आयोग, मुंबई यांचे कडे तक्रार केलेली होती. मा.आयोग यांचेकडे तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी दि. २१.१०.२०१५ रोजी घेण्यात आली होती. उक्त सुनावणी मध्ये प्रशासनातर्फे चालू वर्षाच्या दराप्रमाणे विषयांकीत भुखंड देण्याचे मनपा प्रशासनाने या पुर्वी पत्र क्र. अमनपा/आयु/ससंनर /३०२९, दि. २०.१०.२०१५ रोजी कळविले होते. आवेदक संस्थेने दरामध्ये सुट देणे संबंधात विनंती आयोगाकडे केली असता.मा.आयागा व्दारे सवलतीचे दरा संबंधातील शासन निर्णय, धोरण इत्यादी आवेदक संस्थेने महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावे असे निर्देश सुनावणिचे वेळी देण्यात आले होते. आवेदक संस्थेने कुठलेही शासन निर्णय व धोरण महानगरपालिकेकडे सादर केले नाही, तथापि चालू वर्ष सन २०१७-१८ चे आर.आर. चे दर रु. ४१००/- प्रति चौ.मी. दराने एक मुस्त रक्कम भरणेस तयार आहे. अशी संमती दिली व दि. १०.०१.२०१८ रोजी आयोगाकडे झ ालेल्या सुनावणी मध्ये लेखी संमती, विषयांकीत आवेदक संस्थेने दिली.

सन २०१७-१८ या चालू वर्षाचे आर.आर. चे दरा प्रमाणे खालील भुखंड आवेदक संस्थेचे सभासद यांना देणे संबंधात आमसभेची मान्यता घेऊन शासन मंजुरी करीता प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सुनावणिचे वेळेस मनपा प्रशासना तर्फे पत्र क्र.

अमनपा/आयु/ससंनर/२९८५, दि. ०९.०१.२०१८ नुसार आयोगास कळविले आहे. खालील प्रमाणे

| अ. क्र. | माजी सैनिकांचे नांव | भुखंड क्र. | प्रस्तावित जागेचे क्षेत्रफळ | सन २०१७ चे आर.आर. चे दर प्रती चौ.मी | भुखंडाची किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव सं. शिरसाठ | २०७ पैकी | ६८.७० चौ.मी | रु. ४,१००/- | रु. २,८१,६७०/- |
| २ | श्री. बापुराव दे. आठवले | २०७ पैकी | ६८.७० चौ.मी | रु. ४,१००/- | रु. २,८१,६७०/- |
| ३ | श्रीमती सुभद्रा पु. गवई | २११ पैकी | ६८.२५ चौ.मी | रु. ४,१००/- | रु. २,७९,८२५/- |
| ४ | श्री. बाळकृष्ण बि. शेंडे | २११ पैकी | ६८.२५ चौ.मी | रु. ४,१००/- | रु. २,७९,८२५/- |
| ५ | श्री. नामदेव चं. ढोले | २१२ पैकी | ६९.३२ चौ.मी | रु. ४,१००/- | रु. २,८४,२१२/- |
| ६ | श्री. नाना भि. मकेश्वर | २१२ पैकी | ६९.३२ चौ.मी | रु. ४,१००/- | रु. २,८४,२१२/- |

उपरोक्त भुखंड आवेदक (माजी सैनिक) यांना नमुद किंमती मध्ये देणेच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता मा.आयुक्त यांनी दि. ०९.०१.२०१८ ला दिली आहे. ही सभा सर्वानूमते उपरोक्त प्रशासकीय प्रस्तावास मंजूरी प्रदान करीत असून, सभागृहात आलेल्या सूचनेच्या अनुषंगाने, भुखंडाचे दराबाबत तसेच भुखंडाची मागणी करणाऱ्यांचे नावांबाबत, यासबंधीची प्रक्रिया करणाऱ्यांकडुन खातरजमा करुन घ्यावी व श्री.सुरेश शामराव राऊत यांचे नावाचा समावेश करण्यात यावा असे ही सभा सर्वानुमते ही सभा सर्वानूमते ठरविते.

ठराव सर्वानूमते मंजूर

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती.

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महानगरपालिका,अमरावती.

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>(प्रशासकिय विषय)</u>**

**<u>विषय क्रमांक ०७</u> :-** लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०१७-१८ करीता रु. ५.०० कोटी रुपयाच्या कामांना सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रदान करणेबाबत.

**<u>ठराव क्रमांक ०७</u> :-** उपरोक्त विषयास अनुसरुन लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०१७-१८ करीता अमरावती महानगरपालिकास रु. ५.०० कोटी रुपयाच्या निधी प्राप्त होणार आहे. त्या अनुषंगाने झोन क्र. १,२,३,४ व ५ पाचही झोन अंतर्गतच्या कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांचे मार्फत निकडीच्या कामा बाबतची सर्व्हेक्षण करण्यात आलेले आहे. पाचही झोनचे सर्व्हेक्षण केल्यानंतर झोन निहाय, प्रभाग निहाय घोषीत स्लमचे कामाबाबतचे यादर तयार करण्यात आली असुन एकुण ७० कामांची यादी सोबत संलग्न आहे. सदर्हु कामांची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५,२२,५३,९०२/- असुन यादी मंजुरी करीता मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे पाठविण्याबाबत सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रदान करण्यात यावी या प्रशासकीय प्रस्तावास ही सभा सर्वानूमते मंजूरी प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>(प्रशासकिय विषय)</u>**

**<u>विषय क्रमांक ०८</u> :-** अमृत अभियान अंतर्गत भुयारी गटार योजना (टप्पा - १) चा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत.

**<u>ठराव क्रमांक ०८</u> :-** अमरावती महानगरपालिकेच्या दि. २०.०७.२०१६ च्या सर्वसाधारण सभेत अमरावती भुयारी गटार योजना म.जि.प्रा. यंत्रणे मार्फत राबविण्याबाबत व त्याकरीता महानगरपालिकेने म.जि.प्रा. सोबत MoU करण्याचा ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन दि. २०.१०.१६ ला मनपा व म.जि.प्रा. दरम्यान आवश्यक करारनामा (MoU) करण्यात आला तसेच महानगरपालिकेच्या दि. २६.०९.२०१६ च्या सर्वसाधारण सभेत अमृत भुयारी गटार योजने करीता स्वनिधीची २५% रक्कम उभारण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला आहे.

अमरावती शहराची भुयारी गटार योजना मनपाची असुन कार्यान्वीत यंत्रणा म्हणुन म.जि.प्रा. अमरावती ही आहे. सदर अमृत योजनेच्या निविदे संदर्भात कार्यकारी अभियंता म.जि.प्रा. अमरावती कडुन प्राप्त झालेली माहिती येणे प्रमाणे :

**मंजुर योजनेत समाविष्ट उपांगे :**

| | | |
|---|---|---|
| १) | झोन क्र. ४ व ५ मधील एकुण २४६४६ प्रॉपर्टी कनेक्शन करणे | ४४.१५ कोटी |
| २) | झोन क्र. २ व ३ करीता गाडगेनगर नाला ते लालखेडी मलशुध्दीकरण केंद्रापर्यंत संयुक्त मुख्य मलवाहिनी टाकणे | १२.३० कोटी |
| ३) | a. प्रमुख रस्त्यांवर संयुक्त मुख्य मलवाहिनी पुश थ्रु पध्दतीने क्रॉस करणे<br>b. रस्त्यांची आवश्यक असलेली दुरुस्ती | १.२८ कोटी<br>०.४१ कोटी |
| ४) | गाडगे नगर व नवसारी नाल्यावरती बंधारा बांधून मलप्रवाह संयुक्त मुख्य मलवाहिनीत घेणे | १.०० कोटी |
| ५) | जुन्या मलवाहिन्या मधील ७१ गॅप्सीची कामे पुर्ण करणे | ५.९० कोटी |
| | **एकुण** | **६५.०४ कोटी** |

अमृत योजनेस दि. १२.०५.२०१७ ला प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर दि. २२.०५.२०१७ ला योजनेची रु. ६३.०७ कोटी किंमतीची निविदा प्रसिध्द करण्यात आली. या निविदेत प्रॉपर्टी कनेक्शन करणे व जुन्या ७१ गॅप्सची कामे पुर्ण करणे या सारखी अवघड व जटील कामे असल्या कारणास्तव निविदेस कंत्राटदारांचा प्रतिसादर कमी होता. त्यामुळे सदर निविदा परत तीनदा पुनः प्रसिध्द केल्यानंतर निविदा भरलेल्या तीन कंत्राटदारा पैकी सर्वात कमी किंमतीचा देकार २३.८९% जास्त दराचा होता. तसेच दि. १९.०८.२०१७ च्या शासन निर्णया अन्वये GST करीता प्राप्त निर्देशांकरीता ही निविदा रद्द करण्यात आली. GST च्या अटी-शर्ती सह ही निविदा दि. ०५.०९.२०१७ ला पुनः प्रसिध्द

करण्यात आली. या निविदे अंतर्गत सादर केलेल्या चार कंत्राटदारा पैकी सर्वात कमी देकार रु. ७६.६० कोटी किंमतीचा असुन तो २१.४५% जास्त आहे. सध्याच्या प्रचलित दरसुची नुसार परिगणित केलेली निविदेची मुल्यांकित किंमत रु. ७७.८९ कोटी इतकी असून ती निविदा किंमत पेक्षा २३.५०% जास्त दराचा आहे. त्यास अनुसरुन मुल्यांकित किंमतीपेक्षा कंत्राटदाराचा देकार १.६६% कमी दराचा आहे. सध्यास्थितीत दि. २४.११.२०१७ ला निविदा प्रस्ताव म.जि.प्रा. कडुन शासनाच्या नगरविकास विभागाकडे मंजुरीस्तव सादर असुन त्यानुसार वाढीव दराच्या निविदेमुळे योजनेच्या खर्चात रु. १४.५४ कोटी संभाव्य वाढ होणार आहे. सदर निविदा परत तिसऱ्यांदा बोलाविण्यास ती आतापेक्षा कमी दराची येण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे आतापर्यंत टाकण्यात आलेल्या मलवाहिन्या व बांधण्यात आलेले मलशुध्दीकरण केंद्र यांचा पुरेश्या क्षमतेने वापर व्हावा व त्याकरीता खर्ची झालेल्या निधीचा उपयोग व्हावा या करीता रु. १४.५४ कोटी वाढीव खर्चास मंजुरी आवश्यक आहे.

अमृत अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानूसार व म.जि.प्रा.शी करण्यात आलेल्या MoU मधील कलम B(८) नुसार वाढीव खर्च महानगरपालिकेस करावयाचा आहे. मात्र महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती पाहता ते शक्य नाही. त्यामुळे आधीच्या मंजुर योजनेत होणारा वाढीव खर्च जोडुन सुधारीत योजना शासनास सादर करणे योग्य होईल. त्यास अनुसरुन रु. ६५.०४ + १४.५४ = ७९.५९ कोटी किंमतीचा सुधारीत योजनेचा प्रस्ताव म.जि.प्रा. मार्फत तयार करण्यात आला आहे.

याविषयी सर्वसाधारण सभेचा मान्यते बाबतचा ठराव शासनाकडे पाठविण्याच्या प्रस्तावा सोबत सादर करणे आवश्यक आहे. तरी माननीय सभेने सदर विषयी चर्चा करुन योग्य निर्णय घेण्याबाबतचे प्रशासकीय प्रस्तावास ही सभा सर्वानूमते मंजूरी प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>(प्रशासकिय विषय)</u>**

**<u>विषय क्रमांक ०९</u> :-** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ निधी प्राप्त बाबत.

**संदर्भ :-** १.क्र.जिनिस/अम./जि.भवन/जिवायो१७-१८/पुनर्वि-निवि/नगरविकास /१९६०, दि. २२ जुन २०१७
२.क्र.जिनिस/अम./जि.भवन/जिवायो१७-१८/पुनर्वि-निवि/नगरविकास/ २०७५, दि. १८ ऑक्टोंबर २०१७

**<u>ठराव क्रमांक ०९</u> :-** जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ मध्ये अमरावती महानगरपालिकेस संदर्भ क्र. १ अन्वये रु. ४.६० कोटी व संदर्भ क्र. २ अन्वये रु. २.७६ कोटी असे एकंदर रु. ७.३६ कोटी निधी बाबत वितरण आदेश प्राप्त झालेले आहे. ह्या निधी मधून शहरामध्ये विकास कामे घेण्याबाबत सन्मा.सदस्य तसेच मा. आमदार अमरावती मतदार संघ व बडनेरा मतदार संघ ह्यांची यादी प्राप्त झालेली आहे. सदर कामाची यादर संलग्न केलेली आहे.

शासन निर्णय क्र. जिवायो १००७/प्र.क्र. ३९/का-१४४४ दि. १६ फेब्रुवारी २००८ अन्वये सर्वसाधारण जिल्हा विकास योजना निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे या निधीतील कामाना प्रशासकिय मान्यता देण्याबाबतची सुधारीत कार्यप्रणाली बाबतचा शासन निर्णय आहे. ह्यामधील पेज क्र. ५ परिच्छेद क्र. ३-३.२ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थाकडे (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपंचायत) योजनासाठी त्यांना असलेल्या प्रशासकिय मान्यतेचे अधिकार प्रचलित पध्दतीप्रमाणे कायम राहतील असे नमुद केलेले आहे.

सदर निधीमधून सन्मा. सदस्य तसेच मा. आमदार, अमरावती मतदार संघ व बडनेरा मतदार संघ ह्यांनी सुचविलेल्या प्रस्तावित विकास कामाचे यादी सोबत संलग्न करण्यात आलेली आहे. तरी प्रस्तावित कामाच्या निवडी संदर्भात सभेच्या निर्णयाकरीता सादर

करण्यात आलेल्या प्रशासकीय प्रस्तावास ही सभा सर्वानूमते मंजूरी प्रदान करीत असून शासन निर्णयानूसार अतिरिक्त ५० टक्के वाढीव कामे व मा.आमदारांनी प्रस्तावीत केलेली कामे मा.महापौर,मा.उपमहापौर व मा.स्थायी समिती सभापती यांनी निश्चित करावी असे ही सभा ठरविते.

ठराव सर्वानूमते मंजूर.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.**

**(प्रशासकिय विषय)**

**विषय क्रमांक १० :-** वनसंवर्धन अधिनियम- १९८० अंतर्गत संजय गांधी नगर नं. २ करीता ५.२६ हे.आर. वन जमिन मागणी बाबतचा प्रस्ताव तयार करणे करीता वनसर्वेक्षकाची मानधन तत्वावर नेमणूक करणेबाबत.

**ठराव क्रमांक १० :-** अमरावती महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत असणाऱ्या संजय गांधी नगर नं. २ क्षेत्रफळ ५.२६ हे.आर. जागा या वस्तीचा भाग वनपरिक्षेत्रात येतो तो वगळून त्या बदली मौजे बुधन येथील १३.५६ हे.आर. जागा वन विभागास देण्याचा प्रस्ताव तयार करणे करीता एक नोडल अधिकारी ची गरज आहे.

श्री. सुरेश बाळकृष्ण दाभाडे हे वनविभागातून सेवा निवृत्त झालेले वन सर्व्हेक्षक असून त्यांना या कामाचा अनुभाव असल्यामुळे व संजय गांधी नगर चे प्रकरण त्यांनी यापुर्वी हाताळले असल्यामुळे श्री. सुरेश बाळकृष्ण दाभाडे, सेवानिवृत्त सर्व्हेअर, वनविभाग अमरावती यांना सेवा करार पध्दतीने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण - २७१५/प्र.क्र. १००/१३, दि. ०२.०३.२०१६ नूसार व त्यातील सर्व अटी व शर्ती नूसार पुढील तीन महिने कालावधी करीता नेमणूक करण्यास प्रशासकिय मान्यता प्रदान झाली असुन प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस सविनय सादर करण्यात आलेल्या प्रशासकीय प्रस्तावास ही सभा सर्वानूमते मंजूरी प्रदान करीत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>शासनाचे पत्र (सभेचे अवलोकनार्थ)</u>**

**<u>पत्र क्रमांक ०१</u> :-** नागरी स्थानिक संस्थांच्या कामकाजाबाबत सूचना, मोकळया भुखंडावर आकारावयाचे शुल्क व त्यावरील व्याजाबाबत.

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण -२०१७/प्र.क्र.१४०/नवि-२० मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक २४ नोव्हेंबर २०१७

नागरी स्थानिक संस्थांच्या कामकाजाबाबत सूचना, मोकळया भुखंडावर आकारावयाचे शुल्क व त्यावरील व्याजाबाबत, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण -२०१७/प्र.क्र.१४०/नवि-२० मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक २४ नोव्हेंबर २०१७ च्या पत्राचे सभागृहाने अवलोकन केले.

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती.

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महानगरपालिका,अमरावती.

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>शासनाचे पत्र (सभेचे अवलोकनार्थ)</u>**

**<u>पत्र क्रमांक ०२</u>:-** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ निधी प्राप्त बाबत.

**संदर्भ:-** क्र.जिनिस/अम/जि.भवन/जिवायो/१७-१८/पुनर्वि-निवि/नगर विकास /२६०५

दि.३० डिसेंबर २०१७

- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ निधी प्राप्त बाबत क्र.जिनिस/अम/जि.भवन/जिवायो/१७-१८/पुनर्वि-निवि/नगर विकास /२६०५ दि.३० डिसेंबर २०१७ च्या पत्राचे सभागृहाने अवलोकन केले.

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती.

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महानगरपालिका,अमरावती.

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच</u>**
**<u>दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>शासनाचे पत्र (सभेचे अवलोकनार्थ)</u>**

**<u>पत्र क्रमांक क्र. ०३</u>** :- अमरावती महानगरपालिकामधील स्थानिक संस्था कराचे दर पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबत.

**<u>संदर्भ-</u>** महाराष्ट्र शासन निर्णय क्र.स्थासंक-२०१७२प्र.क्र.१७(अ)/नवि३२ मंत्रालय मुंबई ३२ दि.८ जानेवारी २०१८.

- अमरावती महानगरपालिकामधील स्थानिक संस्था कराचे दर पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.स्थासंक-२०१७२प्र.क्र.१७(अ)/नवि३२ मंत्रालय मुंबई ३२ दि.८ जानेवारी २०१८ च्या पत्राचे सभागृहाने अवलोकन केले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |

**<u>दिनांक १९.१.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेला तसेच दिनांक १७.२.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**प्रस्ताव (सन्मा.सदस्यांकडुन आलेला)**

**<u>प्रस्ताव क्रमांक ८७</u>:-** अमरावती शहरातील राजापेठ उड्डाणपुलाचे सुरु असलेले काम,त्यावर येणारा खर्च व भुअभिग्रहण याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

सुचक:-श्री.चेतन पवार

अनुमोदक:-श्री.ऋषी खत्री.

**<u>ठराव क्रमांक ८७</u>:-** अमरावती शहरातील राजापेठ उड्डाणपुलाचे सुरु असलेले काम,त्यावर येणारा खर्च व भुअभिग्रहण याबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानूमते असे ठरविण्यात येते की, पोलिस विभागाचेवतीने होणाऱ्या बैठकीमध्ये राजापेठ रेल्वे फाटकाचे आतील प्रभागामधील सर्व सन्मा.नगरसेवकांना निमंत्रीत करण्यात यावे. तसेच राजापेठ रेल्वे फाटक बंद होत असून त्यासबंधीच्या पर्यायी मार्गासबंधीची माहिती प्रसिध्दी माध्यमातुन जनतेपर्यंत पोचविण्यात यावी व पर्यायी मार्ग हे सुस्थितीत मोकळे राहतील याची दक्षता प्रशासनाने घ्यावी असे ही सभा सर्वानूमते ठरविते.

ठराव सर्वानूमते मंजूर

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव, | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |